ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ४५

सिद्धार्थ कांबळे

(इ. १०वी १९७८)

दि. ५ डिसेंबर २०२१

ज्या ठिकाणी जसे नेतृत्व असते त्या ठिकाणी तशी वाटचाल घडते. गटातल्या प्रत्येकाची क्षमता पूर्ण वापरून घेण्याची ताकद नेत्याजवळ असायला हवी. आप्पांच्या शिकवणीतून आम्हाला कर्तृत्व, वक्तृत्व आणि नेतृत्व हे तीन शब्द आणि त्यांचे अर्थ समजले. कर्तृत्व असल्याशिवाय वक्तृत्वाला अर्थ नाही; आणि कर्तृत्व-वक्तृत्वा शिवाय नेतृत्व घडत नाही – हे जे त्याकाळी आम्ही शिकलो ते आजही पटते. मला वाटते प्रत्येक नेतृत्वाला एखादा ठोस पर्याय पाहिजे. कुठल्याही क्षेत्रात एकाच वेळी दोन किंवा त्याहून अधिक नेते असायला लागतील. तसेच सर्वच जण काही नेते होऊ शकणार नाहीत; आणि सर्वांनी तसा प्रयत्नही करू नये असंही मला वाटतं. त्याकाळी मात्र नेता म्हणजे काय हे आप्पांना पाहतच आम्ही मोठे झालो.

गेल्या काही दशकांमध्ये भारताने सर्वच क्षेत्रात आणि विशेषतः टेलिकॉम क्षेत्रात जी प्रगती केलेली आहे ती जगामध्ये गौरवास्पद आहे हे नक्कीच. त्यामध्ये देखील अनेकांचा हातभार आहे. सर्वोच्च नेता योजना मांडतो. पण एखाद्या रस्त्यावर प्रत्यक्ष केबल टाकण्यासारखे छोटे काम त्या स्तरावरच्या छोट्या अधिकाऱ्याच्या (मुकादम वगैरे) नेतृत्वाखालीच चांगल्या प्रकारे घडते. त्यामुळे सर्वच स्तरांवर चांगले नेतृत्वगुण असलेली माणसे हवीत. अशा सर्वांच्या प्रयत्नातून एकेकाळी 'मागास देश' अशी प्रतिमा असलेला भारत आज आयटी क्षेत्रामध्ये (आणि इतरही अनेक क्षेत्रांमध्ये) खूप पुढे गेलेला आहे. टेलिकॉम, बीएसएनएल आणि तिथून पुढे इतर खाजगी कंपन्या यामध्ये अनेकांचे कष्ट आणि योगदान आहे. कळत-नकळत यातूनच 'रूप पालटू देशाचे' हे स्वप्न पूर्ण होत आहे. रूप पालटू देशाचे ही व्हिजन असलेले आणि तशी दूरदृष्टी असणारे लोक अधिक संख्येने तयार करणे आणि समाजात पेरणे हे प्रबोधिनीचे कायमच मुख्य कार्य राहिलेले आहे.

## पंचगंगा सहकारी साखर कारखाना ते प्रबोधिनीतील सहनिवास



कै. मा. रत्नाप्पा कुंभार यांची प्रबोधिनीला भेट

माझे प्राथमिक शिक्षण वडिलांच्या बदल्यांमुळे उशिरा चालू झाले. माझे वडील प्राथमिक शिक्षक होते. पहिली आणि दुसरीची परीक्षा बाहेरून देऊन मी एकदम तिसरीच्या वर्गात प्रवेश घेतला. पुन्हा वडिलांची बदली कोल्हापूरहून शिरोळला झाली. तिथे माझे चौथीचे शिक्षण झाले. त्यावेळेला कोल्हापूर जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय रत्नाप्पा कुंभार हे ज्ञान प्रबोधिनीच्या सदस्य मंडळावर होते आणि त्यांनी असा आग्रह धरलेला असावा की कोल्हापूरच्या ग्रामीण भागातून दरवर्षी पाच मुले चांगल्या शिक्षणासाठी इथे यावीत. त्यानुसार १९७२साली पंचगंगा सहकारी कारखान्याच्या आवारात परीक्षा झाली आणि त्यातून आम्हा पाच विद्यार्थ्यांची निवड झाली. त्यावेळी उषाताई खिरे परीक्षा घेण्यासाठी कोल्हापूरला आल्याचे आठवते. आम्ही सहनिवासात रहायला आलो. सहनिवासाची सुरुवात बहुदा तिथूनच झाली असावी. अशी निवड होणे हे आमचे भाग्य होते. दोनच वर्षं प्राथमिक शिक्षण घेऊन मी थेट प्रबोधिनीत आलो.



मा. दुर्गाताई दीक्षित

कोल्हापूर आणि पुणे यामध्ये १९७२साली प्रचंड फरक होता. मी पहिल्यांदा पुण्यात आलो तेव्हा एखादे शहर इतके मोठे असू शकते हे मी पहिल्यांदाच पाहिले. पहिली दोन वर्षं आम्ही आप्पांसोबत परांडे-वाड्यातच रहात होतो. शाळेची इमारत इतकी मोठी आणि सुंदर रंगवलेली असू शकते, इतके चांगले आणि विद्यार्थ्यांना मदत करणारे शिक्षक असू शकतात हे आमच्यासाठी नवीन होते. कोल्हापूरवरून आलेले विद्यार्थी म्हणून सर्वच शिक्षक आमच्याकडे विशेष लक्ष द्यायचे हे जाणवायचे, त्यामुळे छान वाटायचं. कोल्हापूरचे पाच जण म्हणजे मी, अजित माने, अरुण आडगाणे, शौकत तरडे, नरेंद्र नाईक (सोबत शौकत तरडे व अजित माने यांची मनोगते दिली आहेत) आमचे पुण्यातील वर्गमित्र आजही चांगल्या संपर्कात आहेत. विनयराव हर्डीकर, विद्याताई, रखमा बॅनर्जी, खरे सर, परचुरे सर, दुर्गाताई दीक्षित हे शिक्षक आम्हाला शिकवायला होते. यशवंतराव लेले त्यावेळी प्राचार्य होते. ते आम्हाला रामायण-महाभारत असा स्वतंत्र विषय शिकवायचे. वामनराव अभ्यंकर आम्हाला संस्कृत आणि गणित शिकवायचे. पहिली दोन वर्षं आम्ही देवनागरीतून इंग्रजी शिकलो याची फार गंमत वाटायची. सुट्टीला गावाकडे आल्यानंतर कुणी स्पेलिंग विचारलं की आम्हाला ते यायचं नाही. पाचवीमध्ये मी अभ्यासात ठीकठाक होतो. सहावी-सातवीमध्ये अभ्यासात चांगली प्रगती केली. आठवीमध्ये पुन्हा पीछेहाट झाली. आठवीच्या दुसऱ्या सत्रानंतर काही विषय कळायला अवघड जाऊ लागले. विषय समजून घेण्यात मला काही अडचण आहे का यावर चर्चा झाली. मला आठवतं, त्यावेळी राजीव बसर्गेकर आणि विनयराव हर्डीकर कोल्हापूरला माझ्या घरी येऊन भेट देऊन गेले होते. नववीमध्ये शाळा सोडून मी पुन्हा कोल्हापूरला आलो. अभ्यासात प्रगती नसल्यामुळे मी माझ्या वर्गातल्या आणि सहनिवासातील मित्रांपासून किंचित दूर पडायला लागलो.

प्रशालेत असताना मित्रांच्यामध्ये खूप गप्पा, नकला अशा गोष्टी चालायच्या. खेळातही मी फारसा पुढे नव्हतो. अनेक खेळ तर मला माहितही नव्हते. शिवाय, खेळ म्हणजे काहीतरी वाईट असाच तोपर्यंत पक्का समज होता. त्यातच सातवीमध्ये असताना मी सिंगलबार वरून पडलो आणि उजवा हात मोडला. आयुष्यात पुढे मला व्हर्टिगोचा त्रास सुरू झाला. त्या आजाराच्या प्राथमिक लक्षणांचा त्रास त्यावेळी कदाचित होत असावा. कबड्डीमध्ये मी एंट्रीला गेलो की पटकन आऊट होऊन जायचो. फूटबॉल खेळताना उगीच इकडे-तिकडे पळत राहायचो. बॉक्सिंगची सुरुवातीला आवड होती; मात्र नंतर तीसुद्धा कमी होत गेली. लांब आणि उंच उडी जमायची. पण मला कधीही डाईव्ह मारता आला नाही. दर शनिवारी तीन वाजता सामने व्हायचे.

रोजच्या खेळात मागे असलो तरी गोल खोखो, हँडबॉलच्या सामन्यांमध्ये मी चमक दाखवायचो. वर्गातल्या मित्रांकडून मला खेळायला नेहमीच प्रोत्साहन मिळायचं. जेव्हा-केव्हा आम्ही क्रिकेट खेळायचो तेव्हा मी खूप मन लावून खेळत असे. सामने संपले की दर शनिवारी व्याखाने असायची. १६ mm प्रोजेक्टरवर कधी आम्हाला चित्रपट आणि महितीपट दाखवायचे ते मी आवडीने पाहत असे.

## सहनिवास व पाहुण्यांच्या भेटी

त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी प्रशालेला दिलेली भेट; तसेच पैलवान सत्पाल यांची भेट, ग. दि. माडगूळकर आणि सुधीर फडके यांचा 'गीत रामायण' कार्यक्रम, द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील यांचे कथाकथन प्रबोधिनीत झाल्याचे आठवते. उपासना मंदिरात उपासना व्हायची. विसूभाऊंचा आवाज आणि गाण्याची पद्धत मला आजही आठवते. उपासना मंदिराच्या कोपऱ्यात एक सूर पेटी ठेवलेली होती, ती मी एकटा असताना वाजवायचो. ग्रंथालयातही बराच वेळ जायचा. मी कथा-कविता लिहायचो. आम्हीच लिहिलेले 'आणि देव पृथ्वीवर अवतरले' हे नाटक सहनिवासातल्या मुलांनी बसवलेले होते. सहनिवासाचे त्यावेळचे प्रमुख आठवले सरांसह आम्ही सर्व बारा मुलांनी त्यामध्ये काम केले होते. अविनाश धर्माधिकारी यांनी आधीच्या वर्षी स्व-लिखित 'विवेकाचा न्याय' हे नाटक सादर केले होते. त्यांचा आदर्श समोर होता. अविदा यांच्यासोबत माझा बराच वेळ जायचा. सज्जनगडला आमची सहल गेली होती. शिवापूर, नारायणगाव अशा गावांमध्ये झालेली हिवाळी शिबिरेही आठवतात.



**त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची प्रशालेला भेट**

पुण्याला येईपर्यंत मी कधीच गणेशोत्सव पाहिला नव्हता. पहिल्याच वर्षी माझ्या आणि शौकतच्या हस्ते प्रबोधिनीमध्ये मूर्तीची पूजा (आरती) झाली होती ही गोष्ट मला पक्की आठवते. आमचा दिवसातला खूप सारा वेळ आप्पांसोबत जायचा. आम्ही पुण्यात पोहोचलो त्यावेळी मात्र आप्पा फ्रान्सच्या दौऱ्यावर होते. गोपाळराव आप्पांसाठी आणि त्यांच्याकडे आलेल्या पाहुण्यांसाठी स्वयंपाक करायचे. आम्हीही गोपाळरावांच्याच हातचा स्वयंपाक जेवायचो. मनोज नरवणे आणि नंदू कोरेगावकर त्यावेळेला आमच्या सोबत रहायला होते. आप्पांकडे विदेशी पाहुणे, विविध संस्थांचे लोक भेटीसाठी यायचे तेव्हा आम्ही तिथे असायचो. रात्रीच्या जेवणाच्या वेळी आम्ही खाली मांडी घालून बसायचो आणि आप्पा खुर्चीवर जेवायला बसायचे. आप्पा रात्री झोपण्यापूर्वी बासरी वाजवायचे. 'विवेकानंद काय म्हणाले?' या पुस्तकाबद्दल मी त्यांना शंका विचारायचो आणि आप्पा जवळ बसून अगदी सोप्या भाषेत समजावून सांगायचे. अनेक बाबींमध्ये आप्पा आमच्याशी वैयक्तिक संवाद साधायचे. त्यावेळी मी अगदी मनमोकळेपणाने माझ्या चुका त्यांच्यासमोर कबूल करायचो. आप्पा आमच्यासाठी एक स्फूर्तीस्थान होते. अर्थात आमचे त्यावेळी कळण्याचे वय नव्हते. पण घरातले म्हणायचे की, 'आप्पा म्हणजे डोंगरासारखा माणूस आहे !'

त्यानंतर आम्ही दोन वर्षे दुर्गाताईंकडे राहिलो आणि पुढचे (माझे शेवटचे) एक वर्ष आठवले सरांकडे राहिलो. आठवले सर खूप मिश्किल आणि मृदु स्वभावाचे होते. त्यांच्या त्याकाळच्या अनेक आठवणी आहेत. आमच्याकडून काही चूका झाल्या तरी फार न रागवता त्यांनी आम्हाला सुधारायची संधी नेहमीच दिली. आठवले सर ज्यावेळी सहनिवास प्रमुख झाले त्यावेळी त्यांनी एक 'तक्रार-वही' ठेवली होती. ज्याची इतर कुणाविषयी तक्रार असेल त्याने ती वहीत लिहायची, आपापसात भांडण करायचे नाही - हा नियम होता. आम्ही त्या वहीमध्ये एकमेकांच्याविषयी वाट्टेल ते लिहायचो. आज जर ती वही सापडली आणि त्यामधले आमचे लेखन समोर आले तर काय होईल सांगता येत नाही. सहनिवासात आम्ही खूप दंगामस्ती करायचो, मारामाऱ्या क्वचितच व्हायच्या. पण एकत्र खूप गप्पा मारायचो, गाणी म्हणायचो. घरातली कामे सर्वजण आळीपाळीने करायचो. अगदी ब्रेड, दूध, भाजी आणणे, स्वच्छतागृह साफ करणे ही सगळी कामे आपापसात वाटून घेऊन करायचो. आणि त्यामध्ये खूप मजा यायची. आजही त्या गोष्टी अगदी स्पष्ट आठवतात.

## टेलिकॉम खात्यात नोकरी

माझ्यासमोर त्यावेळी फार काही उद्दिष्ट नव्हते. मी हट्ट करून प्रशाला सोडल्यानंतर दहावीपर्यंतचे शिक्षण कोल्हापूरात पूर्ण केलं. प्रशालेत आणि कोल्हापूरातील शाळेत खूप फरक होता. बारावीपर्यंत शिकत असताना माझे एक वर्ष वाया गेले. फार प्रयत्न करूनही शिक्षण पूर्ण होण्याचा काही मार्ग दिसत नाही असे वाटल्याने मी नोकरीसाठी प्रयत्न सुरू केले. १९८३ साली बीएससीला ॲडमिशन घेतली. पण पहिल्या वर्षात असतानाच कोल्हापूरला टेलिफोन ऑफिसमध्ये क्लार्क म्हणून नोकरी मिळाली. घरातील आर्थिक परिस्थितीचे कारण त्यामागे होते. मला वाटते गरिबी ही दोन प्रकारची असते : एक असते साधी गरिबी, ज्यामध्ये तुम्हाला हव्या त्या वस्तू मिळत नाहीत. आणि दुसरा एक प्रकार ज्यामध्ये वस्तू तर मिळत नाहीतच; पण स्वाभिमानदेखील वारंवार दुखावला जातो. मी ज्ञान प्रबोधिनीमध्ये शिकून आल्याने मला परिस्थितीचे चटके जादा जाणवले इतकेच. त्यावेळी बारावीच्या शिक्षणावर पोट भरण्याइतपत नोकरी मिळेल; आणि पदोन्नती बद्दल नंतर विचार करता येईल - असा विचार करून मी नोकरीला सुरुवात केली.

मला वाटते माझे काम ५१@५१ मध्ये सांगण्यासारखे मोठे नाही. मात्र छोट्या परिघात देखील प्रबोधिनीतील शिक्षणाचा चांगल्या पद्धतीने वापर होऊ शकतो याचा प्रत्यय आला. कोणत्याही कामाला हलके अथवा हीन न मानता ते निष्ठेने आणि प्रामाणिकपणे करण्याचा मंत्र मला प्रबोधिनीमध्ये मिळाला होता. तेच माझे वेगळेपण होते. मला नोकरी मिळाली त्यावेळी टेलिकॉम आणि पोस्ट खातं एकत्र होते. १९८४मध्ये त्याचे दोन स्वतंत्र विभाग झाले. आताच्या तुलनेत त्यावेळी लोकांच्या गरजा फार वेगळ्या होत्या. लोकांना फोनची फारशी गरज वाटत नसे. फक्त व्यापारी किंवा संस्था अशांकडेच फोन असायचा. त्यामुळे फोन-सुविधेची मागणी खूप मर्यादित होती. त्यावेळी मुख्यतः Voice-communication चालायचे. Data-communication वगैरे गोष्टी खूप नंतर आल्या. साधी एसटीडीची सुविधाही नव्हती. दुसऱ्या गावाला बोलायचे तर ट्रंक कॉल करण्याशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे ऑफिसातील सर्व कामे मंदगतीने चालायची. विज्ञान आणि तंत्रज्ञानाला महत्त्व आल्यापासून इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी क्षेत्रामध्ये बरेच बदल घडून आले. त्यामुळे टेलिकम्युनिकेशन सेक्टरमध्ये प्रचंड वाढ झाली. आज ईमेल, इंटरनेट, सोशल-मीडिया याशिवाय जगण्याचा आपण विचारच करू शकत नाही. हे सर्व बदल घडताना मी तेव्हाच्या दूरसंचार खात्यामध्ये आणि नंतर आताच्या बीएसएनएल मध्ये काम करत असताना पाहिलेले आहे.

**कामातील विविध अनुभव व जबाबदाऱ्या**

सुरुवातीच्या काळात टेलिफोनची मागणी कमी असल्याने क्लार्क लोकांचे काम फक्त साहेब सांगतील तेवढे लिहिणे, टाइप करणे, नियम पाहून काम करणे इतकंच असायचं. बहुतेक काम 'मागे पाहून पुढे' या प्रकारचे असायचे. एक किस्सा इथे सांगण्यासारखा आहे: तेव्हाच्या इलेक्ट्रो-मेकॅनिकल टाईप एक्सचेंजमध्ये टेलिफोन कॉलचे स्वीचिंग (एक टेलीफोन लाईन दुसऱ्या लाईनशी जोडली जाणे) 'सिलेक्टर' नामक यांत्रिक भागाद्वारे घडत असे. हे सिलेक्टर वापरून-वापरून खराब होत असत. त्यांची झीज झाली की चुकीच्या ठिकाणी कॉल लागणे, मध्येच कॉल ड्रॉप होणे असे प्रकार घडायचे. साहजिकच तक्रारी वाढायच्या आणि उत्पन्नावरही विपरीत परिणाम व्हायचा. नंतर कधीतरी नवीन डोम-टाईप सिलेक्टर आले. पण सरकारी कामात मागणीइतका पुरवठा कधीच होत नाही. कोल्हापूरात सहा हजार  टेलिफोन लाइन्स होत्या; आणि त्या प्रमाणात होणारा सिलेक्टर्सचा पुरवठा कोल्हापूरसाठी अपुरा होता. योग्य समर्थन आणि तपशीलवार कारणे देऊन जादाच्या मागणीचे पत्र मुंबईतील सर्कल ऑफिसकडे तात्काळ पाठविणे गरजेचे होते. अशा प्रकारची कामे सरकारी खात्यात फारशी होत नाहीत. मी माझ्या परीने एक चांगला लेटर-ड्राफ्ट तयार केला. माझ्यासारख्या एका अननुभवी क्लार्कने तयार केलेला लेटर-ड्राफ्ट साहेबांना पसंत पडला नाही. त्यांनी संबंधित तंत्रज्ञ, इंजिनिअर्सना बोलावून नव्याने ड्राफ्ट तयार करून घेतला. अनेकांशी विचारविनिमय करून ड्राफ्टमध्ये कित्येक सुधारणा केल्या. सात-आठ वेळा मला तो ड्राफ्ट पुन्हा-पुन्हा टाईप करावा लागला. शेवटी एकदाचा तो ड्राफ्ट फायनल झाला आणि मुंबईला पाठविण्यात आला. सर्कल ऑफिसने कोल्हापूरची जादाची मागणी लगेच मंजूर केली. आश्चर्याची गोष्ट ही की साहेबांसह सर्व टीमने दिवसभर राबून फायनल केलेल्या लेटर-ड्राफ्टमध्ये; आणि मी सुरुवातीला तयार केलेल्या ड्राफ्टमध्ये तसा काहीच फरक नव्हता. असो,

खालच्या ऑफिसकडून वरच्या ऑफिसला एक पत्र जाते, आणि त्या पत्राचा विचार होऊन एखादी मागणी किंवा प्रस्ताव मंजूर होतो - असे तिथे पहिल्यांदाच घडले होते. त्या दृष्टीने आमचा तेव्हाचा ड्राफ्ट एक ट्रेंड सेटर होता. त्यानंतर कुठल्याही युनिटला काही मागणी करायची असेल किंवा नवा प्रस्ताव पाठवायचा असेल तर ते लोक - जस्टिफिकेशन काय द्यायचं? कुठले मुद्दे महत्त्वाचे असतात, ते पत्रामध्ये कसे मांडायचे वगैरे गोष्टींसाठी आमच्या ड्राफ्टचा संदर्भ घ्यायला लागले. कोणत्याही छोट्या-मोठ्या कामामध्ये थोडा वेगळ्या प्रकारे विचार करायचा; आपल्या कक्षेबाहेर जाऊन त्या विषयावर संशोधन करायचे या प्रबोधिनीतील शिकवणीमुळे मी हा ड्राफ्ट एकट्याने बनवू शकलो होतो.

सुरुवातीला माझ्याकडे 'बजेट'चे काम होते. सरकारी कामांवर होणाऱ्या खर्चासाठी फंडस्ची मागणी करणे, झालेल्या खर्चाचे वर्गीकरण करून हिशेब ठेवणे, मिळालेला फंड आणि प्रत्यक्ष खर्च यातील तफावतीची कारणमीमांसा तयार करणे इ. कामांचा त्यामध्ये अंतर्भाव होता. पूर्वी टेलीफोनची मागणी नव्हती, विकास योजना नव्हत्या, खर्च नव्हता... त्यामुळे बजेटच्या कामाला 'डेड-वर्क' समजले जायचे. पुढे टेलिफोन सेवेचा विस्तार वाढला, नवीन तंत्रज्ञान आले, अनेक योजना आल्या, Development activities जोमाने सुरू झाल्या. कोल्हापूर टेलिफोन्समध्ये अत्यंत कार्यक्षम मनुष्यबळ असले तरी पैशांचा प्रश्नही महत्त्वाचा असतो. मागणी योग्य प्रकारे सादर केल्यास पुरेसे फंडस् येतात, खर्चाचा हिशेब चांगल्या पद्धतीने ठेवल्यास वाढीव मागणीचाही गांभीर्याने विचार होतो. पुढे टेलीकॉम क्षेत्रातील विकास कामांत कोल्हापूर जिल्ह्याने मोठी आघाडी घेतली याचे एक महत्त्वाचे कारण आमच्या ऑफिसातून जाणारे परिपूर्ण Budget statements हेही एक होते; की ज्यामुळे अनेक विकास कामांना वेळच्या वेळी पुरेसा निधी उपलब्ध झाला.

१९९८मध्ये मला जे.टी.ओ.चे (कनिष्ठ अभियंता हे) प्रमोशन मिळाले तेव्हा माझ्या कामाचे स्वरूप बदलले. आठ-नऊ वर्षे मी फील्डमध्ये जे.टी.ओ. म्हणून काम केले. सुरुवातीला वारणानगर येथे माझे पोस्टिंग होते. फील्डवर टेलिफोन लाईन कशी जोडतात हे मी तिथे प्रथमच पाहिले. नवीन एक्सेंज चालू करण्यासाठी जागा शोधण्यापासून त्या ठिकाणी यंत्रसामग्री उभी करण्यापर्यंत अनेक कामांविषयी मी फक्त ऐकून होतो. आता त्या कामांची माझ्यावर प्रत्यक्ष जबाबदारी आली. त्या काळांत विकास-कामांचा झपाटा अगदी शिखरावर होता. पूर्वी वर्षामध्ये जितकी नवीन टेलिफोन कनेक्शन दिली जायची तितकी आता आम्ही एका दिवसांत देत होतो. खूप कामे असायची. सकाळी ऑफिसात बसून ग्राहकांना माहिती देणे, त्यांचे अर्ज स्वीकारणे, दुपारी केबल आणि लाईनचे काम पाहणे, संध्याकाळी रोजचे रिपोर्ट पाठविणे, रात्री दूरध्वनी केंद्रातील सॉफ्टवेअरचे काम पाहणे... यामधून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. विकास म्हणजे काय? तो कसा होतो? लोकांची मागणी कशी असते? त्या पुरविताना कोणत्या अडचणी येतात? अशा ग्राउंड लेव्हलवरच्या खूप गोष्टी समजल्या.

**तंत्रज्ञानाचा विस्तार व कामातील उत्तमता**

वारणानगर टेलिफोन एक्स्चेंजमध्ये 'ऑटोमॅटिक फॉल्ट मॅनेजमेंट सिस्टीम' (CFMS) बसवलेली होती. ती संगणकीकृत असल्याने कोणी वापरत नसे. कामातून उसंत मिळे त्यावेळी मी ती सिस्टीम समजून घ्यायचो. थोड्याच दिवसांत आम्ही त्या सिस्टीमचा वापर चालू केला. ही सिस्टीम संगणकीकृत असल्यामुळे Fault analysis विनासायास आणि थोडक्या वेळात करता यायचे. साहजिकच तिथला Fault rate खूप कमी झाला. लोकांच्या तक्रारी कमी झाल्या. विकास-कामांवर अधिक लक्ष देता आले. महाराष्ट्र सर्कलमध्ये ग्रामीण भागातील अशी ही पहिलीच सिस्टीम. त्यानंतर अनेक ठिकाणी CFMS सिस्टीम बसविण्यात आली.



**शिरोली एमआयडीसी, ब्रॉडबँडचे उद्घाटन**

माझे पोस्टिंग शिरोली (MIDC) मध्ये असताना बीएसएनएलची 'ब्रॉडबँड' सेवा सुरू झाली. लोकांना त्यावेळी इंटरनेटची नुसती तोंडओळख होती. इंटरनेटलाही स्पीड असतो आणि ऑनलाइन कामे अधिक वेगाने होऊ शकतात याची कुणाला काही कल्पनाच नव्हती. त्यामुळे ब्रॉडबँड सेवेचे मार्केटिंग करण्याची खूप आवश्यकता होती. शिरोली (MIDC) मध्ये अनेक उद्योग-व्यवसाय असल्याने आम्ही तिथे अडीचशे ब्रॉडबॅन्ड कनेक्शनच्या क्षमतेची यंत्रसामग्री बसविलेली होती. त्याच्या उद्घाटनप्रसंगी मोठा कार्यक्रम करून खूप गाजावाजाही केला. मात्र पहिल्या सहा महिन्यांत फक्त पाच कनेक्शनस् नोंदली गेली. साहजिकच वरच्या ऑफिसकडून खूप दबाव आला. मी यामध्ये पुढाकार घेऊन दोनच महिन्यांत अडीचशे कनेक्शनचे टार्गेट पूर्ण केले. तिथल्या उद्योगपतींना आणि त्यांच्या स्टाफला माहिती सांगून त्यांचे अर्ज भरून घेण्यापासून, प्रत्यक्ष कनेक्शन जोडून देण्यापर्यंतची सर्व कामे मी केवळ एका मदतनीसाला सोबत घेऊन स्वतः करीत असे. त्याच काळात नॅशनल हायवेच्या रुंदीकरणाचे कामही चालू होते. त्यामध्ये जमिनीखालच्या टेलिफोन केबल्स तुटायच्या. आम्ही हायवेचे काम करणाऱ्या कंत्राटदारांच्या संपर्कात राहून आमच्या केबल्स वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करायचो. त्यामुळे मोठे नुकसान टळायचे.

२००६मध्ये मला एसडीईचे (उप विभागीय अभियंता) प्रमोशन मिळाले, आणि माझ्यावर टेंडर सेक्शनची (निविदा-कक्ष) जबाबदारी सोपविण्यात आली. सर्वसाधारणपणे ही जबाबदारी फील्ड-कामांचा दीर्घ-अनुभव असलेल्या, व कायदे-कानून माहीत असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे दिली जाते. मी ती जबाबदारी स्वीकारली तेव्हा नवीन तीन टेंडर उघडायचे होते; व तीन टेंडरच्या तांत्रिक मूल्यमापनाचे काम चालू होते. मला लक्षात आले की टेंडर डॉक्युमेंट मध्ये काही गोष्टी स्पष्ट नाहीत; इतरही अनेक उणिवा आहेत. निरनिराळ्या कलमांचा (Clauses) क्रम योग्य नसल्याने अर्थ लावणेही कठीण आहे. त्यामुळे टेंडर-ओपनिंग किंवा मूल्यमापन करण्यामध्ये काही अडचणी उद्भवत आहेत. काही कलमांतील तरतुदींमध्ये विरोधाभास आहे. त्यामुळे पुढचे टेंडर डॉक्युमेंट तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये मी वैयक्तिक लक्ष घातलं. सर्वप्रथम सर्व कलमे योग्य क्रमाने लावून घेतली. त्यातल्या विसंगती दूर केल्या. अर्थात, एकाच टेंडर डॉक्युमेंटमध्ये हे सगळे बदल घडू शकत नाहीत. सुरुवातीला केलेल्या बदलातून पुढचे नवीन बदल सुचत जातात. टप्प्या-टप्प्याने सुधारणा होतात. त्या अडीच वर्षांच्या काळात आम्ही साधारण शंभर टेंडर्सवर काम केले. शेवटी २०१०साली आम्ही तयार केलेले टेंडर डॉक्युमेंट इतके परिपूर्ण होते की बीएसएनएल हेडक्वार्टरने तेच डॉक्युमेंट 'स्टँडर्डाईज प्रॉक्युरमेंट मॅन्युअल' (Standardized Procurement Manual) म्हणून स्वीकारले आणि सर्वत्र circulate केले. आजही बीएसएनएल मध्ये टेंडरसाठी जो स्टँडर्ड फॉरमॅट वापरला जातो तो मूळचा आम्ही तयार

केलेला मसुदा आहे, ही आमच्या कामाची मोठी पोचपावती आहे असे मला वाटते. मोठ्या पदांवर काम करणाऱ्या आणि निर्णय घेणाऱ्या व्यक्तीला जर असे चांगल्या पद्धतीचे काम पुरवता आले तर तो देखील अधिक चांगले निर्णय घेऊन उत्तम प्रकारे योजना राबवू शकतो. असे काम करण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न केला.

पुढे सावंतवाडीला असताना मी संपूर्ण प्लॅनिंग आणि डेव्हलपमेंट सेक्सनचा इन्चार्ज होतो. त्यावेळी ऑफिस ऑटोमेशन आणि नव्यानेच येत असलेल्या ईआरपी प्लॅटफॉर्मसाठी पायाभूत असे खूप काम करावयाचे होते. डेवलपमेंट सेक्सनचा इन्चार्ज म्हणून माझ्यावर मोठी जबाबदारी होती. अर्थात माझ्याकडे खूप चांगली टीम होती. अनेक उच्च-शिक्षित तरुण मुलं माझे सहकारी म्हणून काम करत होती. त्यामुळेच या संदर्भातले सर्व टार्गेट आम्ही वेळेत पूर्ण करू शकलो. मी स्वतः खूप कमी शिकलेला असूनही ME/MTech शिकलेल्या मुलांचा समावेश असलेल्या टीमचे योग्यप्रकारे नेतृत्व करू शकलो. इतका आत्मविश्वास मला ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतल्या शिक्षणामुळेच मिळाला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वापरात नसल्याने obsolete झालेले खूप सारे स्टोअर मटेरिअल पडून होते. त्या मटेरिअलने प्रचंड जागा व्यापली होती; तसेच त्या मटेरिअलच्या मेंटेनन्स वरही फार खर्च होत असे. पण नियमाप्रमाणे ते मटेरिअल भंगारात विकताही येत नव्हते. त्यासाठी आम्ही एक विशेष प्रस्ताव तयार करून तो बीएसएनएल मुख्यालयाकडे पाठवून दिला. त्यांनी तो मंजूर केला. आणि त्या पडून राहिलेल्या साहित्याच्या विक्रीमधून बीएसएनएलला कोट्यावधी रुपयांची अर्थप्राप्ती झाली. हे देखील पुन्हा एकवार ट्रेंड-सेटर काम झाले. कारण इतर सर्व कार्यालयांनी आमच्याच पत्राची कॉपी करून त्याचप्रमाणे आपापले प्रस्ताव पाठविले. पुढे मुख्यालयानेही तीच प्रोसीजर standardize करून टाकली.

सिंधुदुर्गहून परत कोल्हापूरला आल्यावर मी ट्रान्समिशन सेक्शनमध्ये ऑप्टिकल फायबर केबल मेंटेनन्सचे काम पाहू लागलो. त्यानंतर नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क (NOFN) या भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामध्ये प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पहिल्या फेजमध्ये समावेश असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील सहा तालुक्यांच्या सर्व गावांमध्ये आम्ही पायी फिरून सर्वेक्षण केले. विशेष प्रकारचे नकाशे तयार केले. प्रोजेक्टच्या प्रत्यक्ष कामाला मोठ्या धडाक्यात सुरुवात केली. त्यावेळी इतर अनेक ठिकाणाहून आमच्याकडे (बीएसएनएल कोल्हापूरकडे) मार्गदर्शनासाठी संपर्क होत असे. या कामाच्या निमित्ताने फॉरेस्ट, पीडब्ल्यूडी, जिल्हा-परिषद, ग्राम-पंचायती, महसूल, मराविमं, महावितरण, पोलिस... अशा अनेक खात्यातील मोठ-मोठ्या अधिकाऱ्यांशी (आणि कर्मचाऱ्यांशी) माझा खूप संबंध येत असे. त्या सर्वांशी योग्य विचारविनिमय करून, वाद-विवाद टाळून, त्यांच्या खात्याचे नियम समजवून घेत; प्रत्येकाच्या सहकार्याने आपले काम पुढे रेटण्याचा मी नेहमीच प्रयत्न केला. नोकरीमध्ये कामाच्या आणि ट्रेनिंगच्या निमित्ताने मला नागपूर, म्हैसूर, बंगलोर, पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई, दिल्ली, जबलपूर अशा अनेक ठिकाणी खूप फिरायला मिळाले.


**म्हैसूर येथील ट्रेनिंग सेंटर**

### औपचारिक व अनौपचारिक शिक्षण

प्रबोधिनीमध्ये अनेकांकडून खूप काही शिकता आले. तिथे नकळतही अनेक गोष्टी शिकायला मिळायच्या. आम्ही शाळेत असताना गिरीशराव नुकतेच अकरावी झाले होते. ते तळघरात व्यायाम करायचे. आप्पा, आण्णा, वामनराव, विनयराव यांना मी जवळून पाहिले. पाच वर्षं अविनाश धर्माधिकारी देखील आमच्या सोबत होते. त्यांनी आमच्या वर्गावर कधी-कधी इतिहासाचे तास घेतल्याचे आठवते.


मी प्रबोधिनीतील शिक्षण सोडून ज्यावेळी कोल्हापूरला परत आलो त्यावेळी या दोन्ही शिक्षण-पद्धतीमध्ये मला बराच फरक जाणवला. कोल्हापूरला शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये अगदी औपचारिक नाते असायचे. आपण कुणाशी दुजाभाव करतोय असे विद्यार्थ्यांना वाटू नये ही भीती शिक्षकांच्या मनात असल्याने ते बऱ्याचदा विद्यार्थ्यांशी वैयक्तिक संवाद साधायला टाळत असत. येथील शिक्षण-पद्धतीमध्ये परीक्षेला खूप महत्त्व होते. आणि प्रबोधिनीप्रमाणे विद्यार्थ्याचे ज्ञानवर्धन किंवा मूल्यमापन यावर फार विचार होत नव्हता. इथे मुलांच्या क्षमता, त्यांचा मानसिक कल या गोष्टी फारशा विचारात घेतल्या जात नाहीत. हुशार मुलांना खेळामध्ये भाग घेतला जाऊ देत नव्हता. आमच्या हुशार म्हणून गणल्या गेलेल्या तुकडीतील निम्मी मुले दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत गणित आणि इंग्रजीमध्ये नापास झाली होती. मुलांच्या आणि पालकांच्या महत्त्वाकांक्षा खूप लहान होत्या. दहावीपर्यंतचे शिक्षणच अनिवार्य होते. त्यानंतरचे शिक्षण जवळपास ऐच्छिक असायचे. या भागातील पालक स्वतः फार शिकलेले नसल्याने त्यांना उच्च शिक्षणाचे महत्त्व कळत नव्हते. कॉलेजेस संख्येने कमी होती. कॉलेजमधील

शिक्षणाचा खर्चदेखील अनेकांना परवडणारा नव्हता. प्रबोधिनीमध्ये मुले आणि शिक्षक यांच्यामध्ये जवळचं नातं असायचं. मुलांच्या क्षमता-विकास, व्यक्तिमत्त्व-विकास; आणि सर्वांगीण प्रगती यावर विशेष लक्ष दिलं जायचं. त्यामुळे आज मागे वळून पाहताना मला असे वाटते की ज्ञान प्रबोधिनी ही एक आदर्श शिक्षण पद्धती आहे. चांगले आणि वाईट यामधला फरक कळणे; स्वतःच्या आणि इतरांच्या क्षमता ओळखणे; कुठलाही भेदभाव न करता व्यक्ती आणि घटनांकडे पाहणे; अंधश्रद्धांपासून लांब राहणे; आणि देशाने मला काय दिले, यापेक्षा मी देशाला काय देऊ शकतो? असा विचार करणे अशा या शिकवणुकीचा आयुष्यभर फार फायदा झाल्याचे जाणवते. सार्वजनिक वर्तणूक कशी असावी किंवा आजच्या भाषेमध्ये ज्याला एटिकेट्स म्हणतो ते आम्ही प्रबोधिनीमध्ये शिकलो. हे त्याकाळी कोल्हापूरच्या शाळेमध्ये शिकायला मिळाले नाही. आयुष्यात मी काही फार मोठे (लोकांना आवर्जून सांगण्यासारखे) काम केलेले नाही. मात्र प्रबोधिनीतील शिक्षणाचा माझ्या आयुष्यावर मोठा प्रभाव राहिला आहे. आणि मी जे अल्प-स्वल्प काम केले त्यामध्ये यशस्वी होण्यात त्या शिक्षणाचा महत्त्वाचा वाटा आहे. क्लार्क असताना 'उत्कृष्ट कर्मचारी' हा पुरस्कार मला मिळाला होता. अधिकारी असतानासुद्धा अशा काही पुरस्कारांसाठी माझ्या नावाची शिफारस झाली होती. याचे सर्व श्रेय प्रबोधिनीचे आहे असे मला वाटते.


मला असं वाटतं की आमच्या पाच जणांची निवड झाली त्या पद्धतीने पुढेही दरवर्षी आणखी काही मुलं सहनिवासात येऊ शकली असती तर मागच्या अनुभवातून पुढचे नक्कीच शहाणे झाले असते. मला वाटतं अनेक गोष्टी आपण इतरांना शिकवताना शिकत जातो. आमच्या ग्रामीण भागातून आणखी काही मुले खालच्या वर्गात येत राहिली असती तर कदाचित मी प्रबोधिनीमधले शिक्षण मध्यावर टाकून तिकडे परतलोही नसतो. पुढेही प्रबोधिनीचे काम मला करता आले असते. आणि आत्तापेक्षाही एखाद्या अधिक चांगल्या कामात स्वतःला गुंतवून ठेवू शकलो असतो. आमच्या पुण्यातील संपूर्ण शिक्षणाचा आणि तिथे राहण्याचा खर्च ज्ञान प्रबोधिनी संस्थेने आणि पंचगंगा साखर कारखान्याने मिळून केला होता अशी माझी समजूत आहे. इतका खर्च करणे ही गोष्ट त्या काळी निश्चित सोपी नव्हती.

ज्या ठिकाणी जसे नेतृत्व असते त्या ठिकाणी तशी वाटचाल घडते. गटातल्या प्रत्येकाची क्षमता पूर्ण वापरून घेण्याची ताकद नेत्याजवळ असायला हवी. आप्पांच्या शिकवणीतून आम्हाला कर्तुत्व, वक्तृत्व आणि नेतृत्व हे तीन शब्द आणि त्यांचे अर्थ समजले. कर्तृत्व असल्याशिवाय वक्तृत्वाला अर्थ नाही; आणि कर्तृत्व-वक्तृत्वा शिवाय नेतृत्व घडत नाही - हे जे त्याकाळी आम्ही शिकलो ते आजही पटते. मला वाटते प्रत्येक नेतृत्वाला एखादा ठोस पर्याय पाहिजे. कुठल्याही क्षेत्रात एकाच वेळी दोन किंवा त्याहून अधिक नेते असायला लागतील. तसेच सर्वच जण काही नेते होऊ शकणार नाहीत; आणि सर्वांनी तसा प्रयत्नही करू नये असंही मला वाटतं. त्याकाळी मात्र नेता म्हणजे काय हे आम्ही आप्पांना पाहतच मोठे झालो.

गेल्या काही दशकांमध्ये भारताने सर्वच क्षेत्रात आणि विशेषतः टेलिकॉम क्षेत्रात जी प्रगती केलेली आहे ती जगामध्ये गौरवास्पद आहे हे नक्कीच. त्यामध्ये देखील अनेकांचा हातभार आहे. सर्वोच्च नेता योजना मांडतो. पण एखाद्या रस्त्यावर प्रत्यक्ष केबल टाकण्यासारखे छोटे काम त्या स्तरावरच्या छोट्या अधिकाऱ्याच्या (मुकादम वगैरे) नेतृत्वाखालीच चांगल्या प्रकारे घडते. त्यामुळे सर्वच स्तरांवर चांगले नेतृत्वगुण असलेली माणसे हवीत. अशा सर्वांच्या प्रयत्नातून एकेकाळी 'मागास देश' अशी प्रतिमा असलेला भारत आज आयटी क्षेत्रामध्ये (आणि इतरही अनेक क्षेत्रांमध्ये) खूप पुढे गेलेला आहे. टेलिकॉम, बीएसएनएल आणि तिथून पुढे इतर खाजगी कंपन्या यामध्ये अनेकांचे कष्ट आणि अनेकांचे योगदान आहे. कळत-नकळत यातूनच 'रूप पालटू देशाचे' हे स्वप्न पूर्ण होत आहे. रूप पालटू देशाचे ही व्हिजन असलेले आणि तशी दूरदृष्टी असणारे लोक अधिक संख्येने तयार करणे आणि समाजात पेरणे हे प्रबोधिनीचे कायमच मुख्य कार्य राहिलेले आहे.



**संचार सारथी पुरस्कार**



Department of Telecommunications

KOLHAPUR TELECOM DISTRICT

KOLHAPUR

This is to certify that

Shri Siddhartha A. Kambale

is adjudged as the best Telecommunication official among the T. O. A. cadre in the district and is awarded the title "Sanchar-sarathi" for 1992 – 1993 for his/her commendable work in the field.

No. KTD/09
Kolhapur
Date 15th August 93.

Telecom District Manager
Kolhapur-416003

### संगीताचे शिक्षण आणि कार्यक्रम

लहानपणापासून मी गाणी म्हणत असे पण 'संगीताचं शास्त्रोक्त शिक्षण दिलं जातं' हेही मला ठाऊक नव्हतं. प्रबोधिनीत मला गायनासाठी थोडाफार वाव मिळत असे. पण ठरवून असे मी काही शिकलो नाही. बारावी झाल्यावर मी एका इंग्रजीमाध्यमाच्या शाळेतील शिक्षकाकडे जाऊन गिटार शिकलो. पण स्वतःचे गिटार घेण्याची ऐपत नव्हती. पुढे काही वर्षांनी नोकरी करत असताना शिवाजी विद्यापीठामध्ये शास्त्रीय संगीताचा दोन वर्षांचा डिप्लोमा कोर्स मी पूर्ण केला. अर्थात ही भारतीय शास्त्रीय संगीताची केवळ तोंडओळख होती. नोकरी आणि रोजचा प्रवास यामुळे मनासारखी संगीत–साधना होऊ शकली नाही. पुढे कधीतरी मी वेस्टर्न म्युझिक आणि स्टाफ–नोटेशन यांचा एक क्रॅशकोर्स केला आणि पुन्हा थोडेसे गिटार शिकलो. त्यामुळे मला वेस्टर्न नोटेशन्स वाचून समजू लागल्या आणि गिटार बऱ्यापैकी वाजवता यायला लागले. नंतर मी काही विद्यार्थ्यांनाही शिकवून तयार केले. गिटारवादन आणि गायन याचे आम्ही काही छोटेखानी कार्यक्रम करत असू. पण पुढे प्रमोशन मिळाल्यानंतर कार्यक्रम करणे सोपे राहिले नाही.

माझी मुलं थोडी मोठी झाल्यानंतर आम्ही पुन्हा कार्यक्रम करण्यास सुरुवात केली. त्यामध्ये मी व माझ्या मुलांच्या खेरीज माझे काही मित्र आणि आम्ही तयार केलेले विद्यार्थीही भाग घेत असत. २०१२मध्ये आम्ही 'स्वरविहार' नावाचा एक संगीत–कार्यक्रम उभा केला. त्याची संकल्पना मी तयार केली होती. पुढच्या सहा वर्षांमध्ये 'स्वरविहार'चे साधारण पंचवीस मोठे आणि काही छोटेखानी प्रयोग केले. हे सर्व प्रयोग आम्ही स्वखर्चाने करायचो. अर्थात प्रयोगाच्या ठिकाणी एक देणगी–पेटी ठेवलेली असायची. त्यामध्ये थोडेफार पैसे जमत असत. 'स्वरविहार'च्या प्रयोगांना व्यावसायिक रूप देण्याचा विचारही चालू होता. पण कोविडमुळे त्यावरील काम फार पुढे सरकले नाही.

आमच्या स्वरविहार या संगीत–कार्यक्रमाला नेहमी गर्दी असायची. 'निसर्ग, संगीत आणि मानवी जीवन' ही आमच्या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना होती. लोकांना आमचा कार्यक्रम आवडायचा. कार्यक्रम संपला तरी लोक जागेवरून उठायचे नाहीत; 'अजून एखादे तरी गाणे सादर करा' – असा आग्रह करायचे. तीच खरी कार्यक्रमाच्या यशाची पावती होती असे मला वाटते. लोकांना आम्ही आनंद देत होतो. सर्वच लोकांनी एखादा छंद जोपासावा हा आमच्या कार्यक्रमाचा संदेश होता.

'छोटीशी दुनिया' या नावाचे माझे एक पुस्तक छापून तयार आहे. त्याचे लवकरच प्रकाशन होईल. मनुष्य जेव्हा कोणत्याही क्षेत्रात मोठा होतो त्यावेळी त्याने खरतर अधिकारवाणीने बोलावे असे मला वाटते. त्यामुळे मी फार काही वैचारिक लिखाण केलेले नाही. 'स्वतः आनंदी जगावं आणि इतरांनाही आनंद द्यावा' हे मी माझ्या कादंबरीतून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.



**स्वरविहारचा गट**



**स्वरविहारचे विविध कार्यक्रम**







डावीकडून सिद्धार्थ कांबळे, (मागे उभे असलेले) मकरंद करकरे, अतुलचंद्र कुलकर्णी, शौकत तरडे, अरुण आडगाणे, अनिरुद्ध गाडगीळ



२००२ मध्ये आमच्या तुकडीची पुनर्भेट

**मित्रमंडळींशी जवळीक**

माझी आदरस्थानं अनेक असली तरी, माझ्या प्रबोधिनीतील मित्रांबद्दल मला विशेष आदर आणि अभिमान आहे. उदा. 'पंडित रामदास हे माझे पुण्यातील वर्गमित्र आहेत' हे मी अभिमानाने सांगतो. कोल्हापुरात ज्यावेळी त्यांचा कार्यक्रम असतो त्यावेळी आम्ही सहकुटुंब तो बघायला जातो. माझा मुलगा तबला शिकतो आहे. पंडित रामदास यांनी त्याच्या वहीमध्ये सही (ऑटोग्राफ) दिली तो माझ्या मुलासाठी खूप आनंदाचा क्षण होता. संगीत-रसिकांच्या प्रचंड गर्दीमध्ये ते स्वतःहून माझ्याकडे लक्ष देतात, तो मी माझा सन्मान समजतो. राजेंद्र वैद्य आणि माझ्यामध्येही चांगला संपर्क आहे. राजेंद्र फुटबॉल आणि खो-खो खूप छान खेळायचे. प्रदीर्घ कालावधीनंतर एक वर्षापूर्वी पुन्हा संपर्कात आल्यापासून आमच्यात सतत संवाद होत असतो. मध्यंतरी मला एक गिटार खरेदी करायचे होते. त्यासाठी मी पुण्यात आलो होतो तेव्हा कामाच्या गडबडीत असूनही राजेंद्र मला भेटायला आले होते. मी जेव्हा नव्याने व्हॉट्सॲप गटावर जॉईन झालो तेव्हा माझ्या सर्व वर्गमित्रांनी केलेले माझे स्वागत पाहून मी भारावून गेलो. खरोखरीच मी इतका भाग्यवान आहे की मला असे सर्व चांगले वर्गमित्र मिळाले.


तरुण प्रबोधकांनी प्रबोधिनीचे हे काम सर्वांपर्यंत पोचवायला हवे. प्रबोधिनीच्या शिक्षणाचे विचार हे सर्वदूर पोचले पाहिजेत. हे काम करत असताना तरुणांनी स्वतःची देखील काळजी घ्यायला हवी. इतरांना दिशा देणारे लोक फार मौल्यवान असतात. परवा यशवंतराव, विसूभाऊ आणि इतर ज्येष्ठ सदस्यांचा फोटो पाहिला. त्यावेळी मला भावनाविवश व्हायला झाले. यांच्यामुळे आपण घडल्याची भावना माझ्यासह अनेकांच्या मनात आली असेल. अशी भावना इतरांनीही आपल्याबाबत बाळगावी. असे काम सर्वांच्या हातून घडावे.







कुटुंबासह भटकंती


**माझा छंद**

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट- आनंद, एलिझाबेथ एकादशी, अशी ही बनवाबनवी ...

२. आवडते पुस्तक - बटाट्याची चाळ - पु. ल. देशपांडे

३. आवडते ठिकाण - कोल्हापूर

**पहिली प्रतिक्रिया**

- संगीत- Basic Instinct. प्रत्येक माणसात मुळातच संगीत असते.
- तंत्रज्ञान - माणसाच्या ऐहिक प्रगतीचे साधन.
- सरकारी कामकाज - नियमांनुसार पण रेंगाळत चालणारी गोष्ट.
- आप्पा पेंडसे - डोंगरासारखा मनुष्य !
- ज्ञान प्रबोधिनी- एक आदर्श शिक्षण पद्धती !

४. पुन्हा एकदा जर आयुष्य नव्याने जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल?

- एक खूप चांगला गिटारिस्ट व्हायला आवडेल.

**सिद्धार्थ कांबळे**
**9422043210**
**kambale.siddhartha@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org

**पुढील पानावर मनोगते आहेत**

**अजित माने**



मी शिरोळ तालुक्यातला आहे त्या वेळात रत्नाप्पा कुंभार शिरोळ तालुक्याचे आमदार आणि मंत्री होते. त्यांनी ठरवले की शिरोळ तालुक्यातल्या मुलांना ज्ञान प्रबोधिनीमध्ये पाठवायचं. आमची घरची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने आमच्या शिक्षणाचा खर्च त्यांनीच उचलला. पहिली दोन वर्षं आम्ही आप्पांसोबत रहात होतो. आप्पा, आण्णा, नलुताई उजळंबकर, निलाताई देशमुख, पुष्पाताई आगाशे, विद्याताई हर्डीकर यांनी आम्हाला खूप साहाय्य केले. खेडेगावातून आल्याने शहरी जीवनात कसे वागायचे, चालायचे, बोलायचे हे आम्ही त्यांच्याकडून शिकलो. आप्पांसोबत रोज सकाळी आम्ही उपासनी. तुम्ही जे काम करत आहात त्यात झोकून देऊन पूर्ण उत्तम देणे आणि सचोटीने ते काम करा ही शिकवण आप्पांनी आम्हाला दिली. आण्णा आम्हाला शिवापूरच्या यंत्र शाळेवर घेऊन जायचे. या शिवाय ते कुठेही बाहेर जाणार असतील तर आमच्यापैकी एकाला तरी नक्की घेऊन जायचे. आप्पा देखील प्रबोधिनीत आलेल्या देशातल्या आणि परदेशातल्या पाहुण्यांना आमची ओळख करून द्यायचे. दलावर मोहनराव, शरदराव, रामभाऊ, विसूभाऊ, विवेक कुलकर्णी व गिरीशराव यांचे खूप साहाय्य झाले.

प्रबोधिनी नंतर पुढील दोन वर्षे मी सर परशुरामभाऊ महाविद्यालयात शिकलो. तेव्हा सुद्धा मी आप्पांकडेच रहात होतो. रत्नाप्पा आणि आप्पांनी मनावर घेऊन बारावीपर्यंत मला तिथेच ठेवून घेतले. माझ्यासाठी वेगळे क्लास त्यांनी लावून दिले. त्यानंतर आमच्या गावी जाऊन शिवाजी युनिव्हर्सिटी मधून मी बीएससी आणि एमएससी – केमिस्ट्रीचे शिक्षण घेतले. बीएससी झाल्यानंतरच लगेच मी भारत पेट्रोलियममध्ये नोकरीला लागलो. मी मुंबई रिफायनरी, मार्केटिंग आणि ऑपरेशन्स मधील विविध डिपार्टमेंटमध्ये काम केलेले आहे. सध्या मी चीफ मॅनेजर म्हणून व्हिजिलन्स वेस्टर्न रिजनचे काम म्हणजे महाराष्ट्र, गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड अशा पाच राज्यांचे काम पाहतो. कामानिमित्त अनेकदा मी महाराष्ट्राबाहेर असायचो. आता मला भारत पेट्रोलियममध्ये अडतीस वर्ष पूर्ण झाली आहेत आणि एका वर्षात मी निवृत्त होईन. निवृत्तीनंतर मला पुन्हा प्रबोधिनीचे काम करायला आवडेल कारण इतकी वर्षे आम्ही जे घडलो ते प्रबोधिनीमुळेच असे मला स्पष्ट वाटते.

एक आणखी छोटी आठवण म्हणजे आमचा स्वयंपाक गोपाळराव करायचे. ते आप्पांसाठी धिरडी करायचे तशी चव पुन्हा कुठे चाखायला मिळाली नाही. एकदम साधे राहणारे आणि प्रेमळ गोपाळराव अप्रतिम स्वयंपाक करायचे. आप्पा, दुर्गाताई दीक्षित, आठवले सर ह्यांनी आम्हाला सहनिवासात खूप साहाय्य केले आणि एका अर्थाने आम्हाला जीवनाची दिशा दिली.

**शौकत तरडे**



१९७२ साली एका छोट्याशा गावामधून वयाच्या नवव्या वर्षी पहिल्यांदा पुण्यात आलो. आम्ही पाचजण कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक शाळांमधील निवडक विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेमधून निवडले गेलो होतो. हा एक आयुष्यातला मोठा टर्निंग पॉईंट होता. प्रथमच घरापासून दूर निघाल्यामुळे घरचे सर्वजण काळजीत होते. परांडेवाड्यामध्ये आप्पांच्या सोबत रहाणे, खाणेही सोबतच. शेजारी प्रबोधिनीमध्ये राव व ताया (मोठी यादी असल्यामुळे नावे लिहीत नाही) त्यामुळे कुठून घरची आठवण होणार. प्रबोधिनी हेच आमचं घर! अभ्यासापेक्षा खेळाची जास्त ओढ. प्रबोधिनीत खेळल्या जाणाऱ्या प्रत्येक (Indoor-outdoor) खेळात प्राविण्य होते.

आज मागे वळून पाहताना जाणवतं, की प्रबोधिनीमध्ये ज्या extra activities शिकलो, ज्यामुळे आमचा self confidance, leadership, जिद्द, नवनवीन शिकण्याची वृत्ती या गोष्टींचा पाया भक्कम झाला. याचाच उपयोग आजही होत आहे व होत राहील.

१२वी सायन्स प्रबोधिनीमध्येच झालो. मार्क बेताचेच होते. आप्पांनी बोलावून विचारले, की पुढे काय करणार? तुला इंजीनिअरिंगला जायचं आहे तर मग तू AMIE कर. तू सहज करू शकशील. कोल्हापूरमध्ये नुकतेच AMIE कॉलेज सुरू झाले होते. (आजचे KIT - Kolhapur Institute of Technology) आप्पांच्या 'तू सहज करू शकशील' या प्रोत्साहन व सल्ल्यामुळे मी सहजच इंजीनिअर झालो. कोल्हापुरातील मेनन ॲन्ड मेनन नंतर बजाज ऑटो, आकुर्डीमध्ये रुजू झालो. नवनवीन शिकण्याच्या वृत्तीमुळे R & D मध्ये वेगवेगळ्या डिपार्टमेंटस्‌मध्ये काम करण्याची संधी मिळाली. (New product - Inspection, Development, Process quality for 2 wheeler and 3 wheeler) बजाजमध्ये इंजीनिअर ते डिव्हीजनल मॅनेजर असा प्रवास सध्या सुरू आहे. आजही बजाजमध्ये बरेच सहकारी मला प्रबोधिनीचा विद्यार्थी म्हणून ओळखतात. हीच माझ्या प्रबोधिनीच्या संस्कारांची पावती.

या सर्व प्रवासात आपण समाजाला काहीतरी देणं लागतो ही भावना स्वस्थ बसू देत नव्हती. मी एका संस्थेबरोबर Community Development चे काम करतो. मुलांमध्ये अभ्यासाप्रती जिज्ञासा निर्माण करणे व प्रौढांना Health Aware करणे यासाठी छोट्या प्रमाणात काम सुरू आहे.